# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
# महाराष्ट्र राज्य, मुंबई

## नागरीकांची सनद

### प्रस्तावना

शिल्प कारागिर प्रशिक्षण ( औद्योगिक प्रशिक्षण संस्था योजना ) भारत सरकारने १९५० साली सुरु केली व १९५६ साली राज्य शासनास अंमलबजावणीसाठी हस्तांतरित करण्यांत आली. औद्योगिक प्रशिक्षणाद्वारे कारखान्यांना लागणारे कुशल कारागीर तयार करण्यांत येतात. त्याचबरोबर युवकांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्ये निर्माण करण्यांत येतात. ज्या विद्यार्थ्यांची **आर्थिक परिस्थिती कमकुवत असते व त्यांना कमी कालावधीत रोजगार मिळवणे आवश्यक असते. तसेच जे विद्यार्थी पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमांत कमी गुण असल्यामुळे** प्रवेश घेवू शकत नाहीत असे विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असतात.

सध्याच्या मुक्त बाजारपेठ व जागतिकीकरणामुळे कुशल कारागीरांना मोठया प्रमाणात मागणी असून त्यांना मिळणा-या सरासरी वेतनांतसुध्दा चांगलीच वाढ झालेली आहे. सद्य:स्थितीत राज्यात **इ.१० वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ०१ वर्ष व ०२ वर्ष कालावधीचे ९३ अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी** या योजनेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक आस्थापनांमध्ये एक ते दोन वर्ष मुदतीचे शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

शासनाची उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणांत होणारी गुंतवणूक लक्षात घेता, मागील पाच वर्षात सतत या योजनेसाठी वाढीव तरतूद करण्यात येत आहे. त्यामुळे कमकुवत गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या अधिक चांगल्या सोई उपलब्ध होत आहेत.

सद्य:स्थितीत राज्यातील ३५८ तालुक्यात वेगवेगळया योजनेंतर्गत ४१९ शासकीय व ६०२ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु असून त्यांची एकूण प्रवेशक्षमता शासकीय १३९६७२ व खाजगी १०१७१२ इतकी आहे.

### विभागाची सर्वसामान्य उद्दिष्टे

व्यवसाय शिक्षणाचे महत्व ओळखून व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना राज्यात राबविणे, उच्च शिक्षणाकडे जाणा-या युवकांचा लोंढा व्यवसाय शिक्षणाकडे वळवून बेरोजगारीवर मात करणे व निरुपयोगी शिक्षणावर होणारा खर्च कमी करणे तसेच राज्यातील महिला, मागासवर्गीय समाज, अपंग या सर्वांना व्यवसाय शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे, राज्यातील उद्योग धंद्याना लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करुन त्याचा सातत्याने पुरवठा करणे व प्रगत तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी कामगारांना अद्यावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे.

### रचना

व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना तालुका व जिल्हा स्तरावर राबविण्यांकरिता संचालनालयाकडे राज्य स्तरावर संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण) यांचे कार्यालय असून संचालनालयाच्या स्तरावर विविध प्रशिक्षण योजनांच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यांत येतात. तसेच तालुका तथा जिल्हा स्तरावर ज्या विविध योजना राबविण्यांत येतात त्यांचे पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्याकरिता प्रादेशिक स्तरावर सहसंचालक, व्यवसाय शिक्षण

व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. जिल्हास्तरावर या योजनांचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्यांकरिता जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. संस्थास्तरावर या योजनांची अंमलबजावणी व पर्यवेक्षण संस्था प्रमुख करतात.

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत पुरविण्यांत येणा-या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ ०२ मध्ये सादर करण्यांत आलेले आहे.

## नियम / शासन निर्णय

या विभागाच्या संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या नियम, सूचना तथा शासन निर्णयाची माहिती वरील संकेतस्थळावर अद्ययावत करण्यांत येते.

## गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी असल्यास त्या संबंधीचे परिच्छेद ०२ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांकडे तक्रारी नोंदविता येतील.

## जनसामान्यांकडून सूचना

सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्या त्या वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमी सहकार्य करेल.

## नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणा-या सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक देण्यांची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

## परिशिष्ठ -२
## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| ०७ | **शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना-** शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना, औद्योगिक आस्थापनांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराकरिता सक्षम बनविणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. संचालनालयांलतर्गत राज्यात ४१९ शासकीय औ.प्र.संस्था व ५७५ खाजगी औ. प्र. संस्था कार्यरत आहेत. त्यांची एकूण प्रवेश क्षमता शासकीय १३९६७२ व खाजगी १०१७१२ इतकी आहे. सदर औ.प्र.संस्थांमध्ये ९३ प्रकारच्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रमामधून प्रशिक्षण घेत असून अंदाजित ९०००० प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण होवून बाहेर पडतात.<br>उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून विविध खाजगी औद्योगिक आस्थापनामधे सामावून घेतले जाते. शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण प्राप्त केल्यानंतर सदरचे उमेदवार हे कुशल कारागीर म्हणून विविध आस्थापनांमध्ये किंवा स्वयंरोजगार करुन रोजगारक्षम बनतात.<br>ऑगस्ट २०१३ पासून गुणवत्ता व सामाजिक आरक्षणावर वर आधारित केंद्रीय पध्दतीने | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | उपसंचालक<br>सहा.संचालक(तां)<br>अधीक्षक (तां)<br>वरिष्ठ लिपिक<br>( पहिला मजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक<br>२६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>१००३/१२०१/१२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक<br>२६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>४००१. |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.<br>औ.प्र.संस्थेतील प्रवेशित एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी (अनुसुचित जमातीतील विद्यार्थी वगळून) आर्थिक दृष्टया मागास असलेल्या ५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना रु.४०/- दरमहा या दराने विद्यावेतन प्रदान करण्यात येत असते. तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु.२०/- अधिकचे विद्यावेतन समाजकल्याण विभागाकडून प्रदान करण्यांत येत असून मागासवर्गीय प्रशिक्षणर्थ्यांना असे एकूण रु.६०/- दरमहा विद्यावेतन प्रदान करण्यांत येते. | | | |
| ०७ | **आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणांचे सार्वत्रिकीकरण करणे** - २८ शासकीय आश्रमशाळांचे रुपांतर व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरमध्ये करण्याची योजना देशात प्रथमच राबविण्यांत आली. याद्वारे ८ वी व १० वी दरम्यान तांत्रिक शिक्षण व तद्नंतर आयटीआयच्या प्रशिक्षणाची सोय आश्रमशाळेतच करण्यात आली आहे. याकरिता सन २००४ मध्ये आदिवासी उमेदवारांसाठी व्यावसाय शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे या अंतर्गत १२ योजना राबविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यांत आला आहे. | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ | उपसंचालक<br>सहाय्यक संचालक (तां)<br>अधिक्षक(तां)<br>वरिष्ठ लिपिक<br>( पहिलामजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३ | संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक ४००१ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | या योजनांमध्ये आदिवासी महिलांकरिता आदिवासी औ.प्र.संस्थांमध्ये विविध व्यवसायांमध्ये प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत. या योजनेमुळे दरवर्षी ७००० आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ होत आहे. या योजनेंतर्गत वसतिगृहात राहणा-या व वसतिगृहाबाहेर राहणा-या आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना अनुकमे रु.६००/, रु.५००/- प्रति माह निर्वाह भत्ता देण्यांत येतो. | दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | |
| ०७ | **महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी व उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करणे.**<br>राज्याच्या औद्योगिकी करण्यात झपाटयाने वाढ होत असते. त्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज लघु, मध्यम आणि मोठया उद्योजकांना निर्माण झाली आहेत. व्यावसाय प्रशिक्षणाद्वारे निर्माण केले जाणारे कुशल मनुष्यबळ सद्य:स्थितीत कमी पडत असल्याकारणाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यांत आली. राज्यातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा उपलब्ध यंत्रसामुग्रीचा महत्तम वापर करुन प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यांसाठी | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसांत निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे | उपसंचालक<br>सहाय्यक संचालक(ता)<br>अधीक्षक (तां)<br>वरिष्ठ लिपीक<br>( पहिलामजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक ४००१ विभागीय सहसंचालक |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | राज्यातील महापालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी तसेच उर्वरित ठिकाणच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी ऑगस्ट २०१० पासून सुरु झाली आहे. | अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | | |
| ०७ | **उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना** - औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणा-या कौशल्यात वाढ व्हावी त्याचप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना कमवा व शिका यासाठी उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना राज्यात प्रथमच सुरु केली आहे याचा लाभ संस्थेला व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या दरम्यान होतो. त्याकरिता सन २००२ पासून राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>या निर्णयाचा फायदा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध प्रकारची बाहेरील कामे स्विकारुन संस्थेतील साधन सामुग्रीचा महत्तम वापर करुन महसूल शासनास जमा करण्यांत येतो. | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसांत निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | उपसंचालक<br>सहाय्यक संचालक(ता)<br>अधीक्षक (तां)<br>वरिष्ठ लिपीक<br>( पहिलामजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/ १२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक ४००१ विभागीय सहसंचालक |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| ०७ | **राज्यातील ४२ अल्पसंख्यांक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत/ दुसरी/तिसरी पाळी व बृहन्मुंबईत २ नवीन औ.प्र.संस्था, मांडवी व चांदिवली ऑगस्ट २००९ पासून सुरु करणे-** अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी राज्यातील ४४ अल्पसंख्यांक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कार्यरत व्यवसायात दुस-या पाळीत २३७ व तिस-या पाळीत ११ अशा एकूण २४८ तुकड्या, त्याचप्रमाणे बृहन्मुंबईतील मांडवी, जि. मुंबई शहर व चांदिवली, ता. नेहरुनगर(कुर्ला), जि.मुंबई उपनगर येथे नव्याने सुरु झालेल्या दोन औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये २८ तुकड्या सुरु करण्यांत आल्या आहेत. | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसांत निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | उपसंचालक सहाय्यक संचालक(ता) अधीक्षक (तां) वरिष्ठ लिपीक ( पहिलामजला ) ( नवीन इमारत ) दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४ विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३ तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ( चौथा मजला ) (नवीन इमारत ) दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४ विस्तारीत क्रमांक ४००१ विभागीय सहसंचालक |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| ०७ | खाजगी कायम विना अनुदान तत्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे/ विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्था नवीन व्यवसाय/जादा तुकडी सुरु करणेबाबत<br>१. पात्रता प्राप्त अर्जदार संचालनालयाच्या संकेत स्थळावर www.dvet.gov.in वर ऑनलाईन स्वरुपात अर्ज करतील.<br>२. ऑनलाईन अर्ज करतेवेळी अर्ज प्रक्रिया शुल्क रुपये २०००/- नोंदणी शुल्क रु. १००००/- भरणा करणे आवश्यक आहे.<br>३. ऑनलाईन अर्जाची व कागदपत्रांची तपासणीकरीता संचालनालय स्तरावर छाननी समिती गठीत करण्यात येते. सदर समितीमार्फत ऑनलाईन प्राप्त झालेल्या अजा्रची छाननी करण्यात येते.<br>४. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची छाननी केली असता संस्थांनी जर मानांकन प्रमाणे अर्ज केलेला नसेल अशा संस्थांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत संधी देण्यात येते.<br>५. संस्थांनी त्रुटी पूर्तता केल्यानंतर छाननी समिती सदर त्रुटीचे अवलोकन करुन सदर संस्थांना शिफारस करते किंवा नाकारते.<br>६. छाननी समितीने शिफारस केलेल्या संस्थांचा अहवाल तयार करुन देते. त्यानुसार सदर संस्थांना राज्य शासनाच्या इरादापत्राकरिता (LOI) शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो.<br>७. NCVT यांची संलग्नता प्राप्त करण्यासाठी आवश्यक कार्यवाही प्रशिक्षण | शासन निर्णयातील तरतुदी व शासनाच्या सूचनांप्रमाणे अर्जांवर कार्यवाही करण्यात येईल. | उपसंचालक/ सहा.संचालक (तां)/ सहा.प्रशि.सल्लागार (तां)/अधिक्षक/ वरिष्ठ लिपिक-२ (पहिला मजला) (जुनी इमारत) दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४ विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , (चौथा मजला) दूरध्वनी क्र. २२६२०६०३/ ६०४ विस्तारीत क्र. ४००१<br>संबंधित संस्थेचे प्राचार्य |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी (दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक) |
|---|---|---|---|---|
| | महासंचालनालय,नवी दिल्ली यांच्या www.dgt.nic.in/ www.nimionlineadmission.in या संकेत स्थळावर देण्यांत आलेली आहे.<br>८. इरादापत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधीत संस्था राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) यांनी विकसित केलेल्या निमी (NIMI) या Portal वर अर्ज करावा लागतो.<br>९. संस्थेने निमी (NIMI) Portal वर अर्ज केल्यानंतर संचालनालय स्तरावरुन सदर संस्थेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करण्यात येते. त्यानुसार संस्थेस निमी (NIMI) Portal वर ०३ प्रकारचे इरादापत्र (LOI) तयार होते.<br>१०. निमी (NIMI) Portal वर संस्थांचे ३ प्रकारचे इरादपत्र निर्गमित झाल्यानंतर संस्थेचे ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने संलग्नता निरिक्षणासाठी निरिक्षण केले जाते.<br>११. संस्थेस DGT, New Delhi यांची संलग्नता मिळाल्यानंतर संचालनालयामार्फत सदर संस्थेकडून अनामत स्वरुपात शुल्क आकारण्यात येते. तदनंतर संस्थेस विद्यार्थी प्रवेशाकरिता परवानगीचे आदेश निर्गमित करण्यात येतात.<br>१२. प्रवेश परवानगी आदेश निर्गमित झाल्यानंतर सदर संस्थेस संचालनालयाच्या https:// admission.dvet.gov.in/ या | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | संकेतस्थळावर संस्थेचे नांव व इतर अनुषंगिक माहिती भरण्यात येते व विद्यार्थ्यांना संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येतो. | | | |
| ०८ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील व्यवसाय शिक्षणांतर्गत माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, + २ स्तरावरील व्दिलक्षी तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम योजना राबविल्या जातात. व्यवसाय अभ्यासक्रमातील नवीन संस्था त्याचप्रमाणे विद्यमान संस्थेत अधिकच्या तुकडयांना कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यासाठी दरवर्षी राज्यामधून अशासकीय संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. शासनाच्या प्रचलित नियमानुसार कायम विना अनुदान तत्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अर्ज मागविणे व तद्नुषांगिक प्रक्रिया पार पाडण्यासाठी.<br>१.पात्रता प्राप्त अर्जदार वर्षभर संचालनालयाच्या संकेत स्थळावर www.dvet.gov.in वर ऑनलाईन स्वरुपात अर्ज करतील.<br>२.ऑनलाईन अर्ज करतेवेळी अर्ज प्रक्रिया शुल्क रुपये २०००/- नोंदणी शुल्क रु. १००००/- भरणा करणे आवश्यक आहे.<br>३. इच्छुक अर्जदार संस्थाकडून Online अर्ज मागविण्यांकरीता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील सर्वाधिक | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसांत निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | उपसंचालक/ सहा.संचालक (तां)/ अधिक्षक/ वरिष्ठ लिपिक-२ (पहिला मजला व दुसरा मजला) (नवीन इमारत) दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४ विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३ तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , (चौथा मजला) दूरध्वनी क्र. २२६२०६०३/ ६०४ विस्तारीत क्र. ४००१ संबंधित संस्थेचे प्राचार्य |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | खप असलेल्या २ वर्तमान पत्रात वर्षातुन एकदा जाहिरात प्रकाशित करणे.<br>४. ऑनलाईन अर्जांची व कागदपत्रांची परिपुर्तता तपासण्याच्या उद्देशाने संगणकीय प्रणालीव्दारे प्राथमिक छाननी करणे.<br>५. प्राथमिक छाननी झालेल्या अर्जाचा संगणकीय प्रणालीव्दारे प्रत्यक्ष निरिक्षणाकरीता शिफारस करणे.<br>६. शिफारस प्राप्त संस्थाना ऑनलाईन निरीक्षण समितीमार्फत (Online Acceptance) देणे.<br>७. निर्देश झालेल्या संस्थाचे संस्थानिहाय निरीक्षण करण्यांचे वेळापत्रक संकेतस्थळावर अपलोड करणे.<br>८. निरीक्षण अहवालाच्या आधारे संगणकीय प्रणालीव्दारे संस्थेस स्विकृत प्रमाणपत्र (LOA) निर्गमित होईल. | | | |
| ०९ | **परीक्षा विभाग-** महाराष्ट्र राज्यामध्ये ४१९ शासकीय औ.प्र.संस्था व ५७५ खाजगी औ.प्र.संस्था कार्यरत आहेत त्या संस्थामध्ये खालील योजनेमध्ये विहीत कालावधीसाठी प्रवेश दिले जातात व त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र व केंद्र शासन स्तरावर विविध परीक्षा घेतल्या जातात.<br>अ) केंद्रशासन स्तरावरील संचालनामार्फत घेण्यात येणा-या परीक्षा<br>१)शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना<br>२)शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या | सहा.संचालक(तां) प्र.सहा.संचालक( तां) कार्यालयीन अधीक्षक वरिष्ठ लिपिक (तिसरा मजला) (नवीन इमारत) दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४/२९३ विस्तारीत क्रमांक ३१७१ | संचालक (चौथा मजला) (नवीन इमारत) दूरध्वनी क्रमांक २२६९५८१९ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | ३) प्रशिक्षणार्थी कौशल्य स्पर्धा परीक्षा (सीटीएस)अखिल भारतीय स्तर<br>४) प्रशिक्षणार्थी कौशल्य स्पर्धा (एटीएस) अखिल भारतीय स्तरावरील विभागीय व अखिल भारतीय स्तर<br>**ब**) महाराष्ट्र शासन स्तरावर खालील परीक्षा घेतल्या जातात.<br>१)एस.सी.व्ही.टी. अंतर्गत अभ्यासक्रमांच्या परीक्षा<br>२) आर्टिझन टू टेक्नोक्रॅट (तृतीय स्तर परीक्षा)<br>३)एम.एस.ई.बी/ जिल्हा परिषद/शासन निर्णयाद्वारे मान्यता प्राप्त व इती आस्थापनांचे प्रायोजित उमेदवारांच्या एस.सी.व्ही.टी. अंतर्गत परीक्षा<br>४)खाजगी उमेदवारांसाठी पूर्व चाचणी परीक्षा<br>५))प्रशि क्षणार्थी कौशल्य स्पर्धा (विभागीय स्तर ) (सीटीएस)<br>६)निदेशक कौशल्य स्पर्धा परीक्षा (जिल्हा ,विभागीय व राज्यस्तर) | स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यात येईल.अन्य विभागांशी संबधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्रायआवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यात येईल. | तसेच संबधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | |
| १० | <u>शिकाऊ उमेदवारी योजना (शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१)</u><br>• **योजनेची पार्श्वभूमी :**<br>कुशल कारागीरास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दिल्यानंतर उद्योगात असणाऱ्या प्रक्रियांमध्ये लागणारी यंत्रसामुग्री तसेच नवीन व आधुनिक | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्ये पार पाडण्यासाठी होणा-या या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १० (१) मधील तरतूदीस अनुसरुन | सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार<br><br>(पाचवा मजला) (नविन इमारत) दुरध्वनी क्रमांक ०२२- | सहसंचालक<br><br>(पहिला मजला) (नविन इमारत) दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२०६०४/ २९३ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | तंत्रज्ञानानुसार औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन हा कुशल कारागीर सर्व दृष्टीने स्वावलंबी बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली.<br>राज्यातील विशिष्ट क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाच्या मागणीस अनुरुप असलेल्या व्यवसायांचा कालावधी राज्य स्तरावर निश्चित केल्यामुळे योजनेची अंमलबजावणी गतीमान पद्धतीने होऊन उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होतात.<br>शिकाऊ उमेदवार भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुधारणा करुन महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ असाधारण क्रमांक २२ दिनांक ०९/०२/२०१८ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ (अधिसूचना) दिनांक ०५/०४/२०१८ नुसार सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्यांकडील मनुष्यबळाच्या २५% शिकाऊ उमेदवार प्राधान्याने भरती करण्यांचे आवाहन करण्यांत आले आहे. | तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यांत येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागा ची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्ती वर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेऊन कार्यवाही करण्यांत येईल. | २२६२०६०४/ २९३ | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे पत्र क्रमांक :-File No. MSDE-०१(०१)/२०१८-AP (PMU) New Delhi, dated ०१/१०/२०१९ अन्वये ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ३० किंवा त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने वित्तीय वर्षात शिकाऊ उमेदवारी भरती २.५% ते १५% (महाराष्ट्रासाठी २५%) पर्यंत करणे बंधनकारक आहे. शिकाऊ उमेदवारी भरती करताना किमान ५% जागा फ्रेशर व कौशल्य प्रमाणपत्र धारक उमेदवारांसाठी आरक्षित ठेवण्यात याव्यात. ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ४ ते २९ पर्यंत मनुष्यबळ आहे, त्या आस्थापनेने शिकाऊ उमेदवारी भरती करणे बंधनकारक नाही, परंतु त्या आस्थापना शिकाऊ उमेदवारी भरती करु शकतात. तीन किंवा त्यापेक्षा कमी मनुष्यबळ असलेल्या आस्थापनेला शिकाऊ उमेदवारी भरती करण्यांस मान्यता नाही.<br>• **योजनेबाबतची इतर माहिती :**<br>औद्योगिक क्षेत्रात प्रशिक्षणाची पातळी सुधारण्याच्या दृष्टीने शिकाऊ उमेदवार अधिनियमाची अंमलबजावणी | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | करण्यांत आली. हा अधिनियम लोकसभेत १९६१ साली मंजूर झाला आणि १९७३ व १९८६ साली त्यात सुधारणा झाली. या अधिनियमाची नियमावली १९६२ साली तयार झाल्यानंतर या राज्यात जानेवारी १९६३ पासून ही योजना राबविण्यांत येत आहे. तसेच केंद्र शासनाने शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत दिनांक २२ डिसेंबर २०१४ व शिकाऊ उमेदवारी नियम १९९२ मध्ये दिनांक १८ जुन २०१५ रोजी महत्वाच्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. या योजनेचे काम पहाण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना “राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार” म्हणून नेमले आहे. तसेच सहा विभागीय कार्यालयाच्या प्रमुखांना “सहप्रशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ)” या पदाचा दर्जा दिलेला आहे. ते त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय /अशासकीय आस्थापनेतील शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गतची कामे पाहतात. राज्य पातळीवर शिकाऊ उमेदवारी योजना अधिक कार्यक्षमपणे राबविण्यासाठी खाजगी व निमसरकारी स्तरावर अडीअडचणींचे निवारण / | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | मार्गदर्शन करण्यासाठी निरनिराळ्या समित्या नेमलेल्या आहेत.<br>महाराष्ट्र राज्यात शासनाची शासकीय ४४ मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रे (BTRI), ०१ बेसिक ट्रेनिंग प्रोव्हायडर (BTP) व अशासकीय १६३ मुलभूत प्रशिक्षण केंद्रे (BTC) अशी एकुण २०८ प्रशिक्षण केंद्रे स्थापन झालेली आहेत. या योजनेनुसार केंद्र सरकारने औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांच्या व्यवस्थापकांच्या माहितीसाठी अधिसूचना प्रसिध्द केल्या व औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना उपयोगी पडतील असे २६१ व्यवसाय निरनिराळ्या ३९ गटांतून निर्देशित केलेले आहेत. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यांत येणाऱ्या व्यवसायांना केंद्र शासनाच्या दिनांक ०७/०९/२०१७ च्या अधिसूचनेनुसार १२३ व्यवसायांना शिकाऊ उमेदवारी लागू केलेली आहे. ३५ गटांतील ४१४ वैकल्पिक (Optional) व्यवसायांनाही शिकाऊ उमेदवारी लागू केलेली आहे. तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत २० व्यवसायांना शिकाऊ उमेदवारी लागू केलेली आहे. | | | |

<table>
<tr><th>कार्यासन क्रमांक</th><th>विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा</th><th>आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते</th><th>सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक )</th><th>सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक )</th></tr>
<tr><td></td><td>
<table>
<tr><th>शिकाऊ उमेदवारीचा प्रकार</th><th>आवश्यक अर्हता</th></tr>
<tr><td>Trade Apprentice</td><td>Passed out of ITIs</td></tr>
<tr><td>Fresher Trade Apprentice</td><td>Class 8th, 10th & 12th pass outs</td></tr>
<tr><td>Graduate Apprentice</td><td>Graduates in Engineering & Non-Engineering courses</td></tr>
<tr><td>Technician Apprentice</td><td>Passed out of Polytechnics</td></tr>
<tr><td>Technician (Vocational) Apprentice</td><td>Passed out of a 10+2 vocational training course</td></tr>
<tr><td colspan="2">Apprentices who are perusing their graduation/diploma courses</td></tr>
<tr><td colspan="2">Apprentices who have passed out of any NSQF aligned Short term training Course including courses under the PMKVY/ DDUGKY/MES</td></tr>
<tr><td colspan="2">Fresher apprentices amongst those who are V pass & above who are not covered under the afore-mentioned categories but meet the Educational/Technical qualifications as specified in the course curriculum</td></tr>
</table>
केद्र शासन प्रत्येक व्यवसायाच्या अभ्यासक्रमाची आखणी करते. शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत शिकाऊ उमेदवारांची अंतिम परीक्षा घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना अंतिम प्रमाणपत्र देण्यांत येते. औद्योगिक कारखान्यात जे शिकाऊ उमेदवार
</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>कार्यासन क्रमांक</th><th>विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा</th><th>आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते</th><th>सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक )</th><th>सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक )</th></tr>
<tr><td></td><td>प्रशिक्षण घेतात, त्यांना प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या दिनांक २५ सप्टेंबर २०१९ च्या राजपत्रानुसार विद्यावेतनाचे दर खालीलप्रमाणे सुधारीत करण्यांत आलेले आहेत.<br><br>विद्यावेतन :
<table>
<tr><th>प्रकार</th><th>विद्यावेतनाचा प्रतिमहा किमान दर</th></tr>
<tr><td>इ. ५वी ते ९वी उत्तीर्ण</td><td>रु.५,०००/-</td></tr>
<tr><td>इ. १०वी उत्तीर्ण</td><td>रु.६,०००/-</td></tr>
<tr><td>इ १२वी उत्तीर्ण</td><td>रु.७,०००/-</td></tr>
<tr><td>राष्ट्रीय /राज्य प्रमाणपत्रधारक</td><td>रु.७,०००/-</td></tr>
<tr><td>तंत्रज्ञ (व्यावसायिक)</td><td>रु.७,०००/-</td></tr>
<tr><td>तंत्रज्ञ (पदविकाधारक)</td><td>रु.८,०००/-</td></tr>
<tr><td>पदवीधारक</td><td>रु.९,०००/-</td></tr>
</table></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी (दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक) |
|---|---|---|---|---|
| | शिकाऊ उमेदवारीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात पहिल्या वर्षातील अनुज्ञेय विद्यावेतन दराच्या अनुक्रमे १०% आणि १५% वाढ अनुज्ञेय असते.<br>• **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी :**<br>दिनांक १९ ऑगस्ट २०१६ पासून www.apprenticeship.gov.in आणि दिनांक ०६ एप्रिल २०२० पासून www.apprenticeshipindia.org या केंद्र शासनाने सुरु केलेल्या संकेतस्थळामार्फत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी केली जाते. आस्थापनेची नोंदणी, प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी, विद्यावेतन अदा करणे व विद्यावेतन प्रतिपुर्ती इत्यादीबाबतची कार्यपध्दती संकेतस्थळावर विस्तृतपणे नमूद केलेली आहे.<br>केंद्र शासनाने सुरु केलेल्या Apprenticeship Training Portal (www.apprenticeshipindia.org) वर ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत खालीलप्रमाणे शिकाऊ उमेदवारांची व आस्थापनांची नोंदणी झालेली आहे. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | <table><tr><th>Sr. No.</th><th>Particulars</th><th>Count</th></tr><tr><td>१</td><td>Apprentice Count</td><td>८४९०३५</td></tr><tr><td>२</td><td>Establishment Count</td><td>२३९३५</td></tr></table><br>• कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.MSDE-१४(०३)/२०२१-AP (PMU) दिनांक २०.१२.२०२१ च्या पत्रान्वये दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून शिकाऊ उमेदवारीच्या परीक्षा पध्दतीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत आली आहे.<br>१. शिकाऊ उमेदवारी परीक्षेसाठी शिल्प कारागीर योजनेच्या व्यवसायातून औ.प्र.संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना Trade Theory, Workshop Calculation and Science, Employability Skills व Engineering Drawing या विषयांची सूट दिली जाईल.<br>२. शिकाऊ उमेदवारांची संलग्न आस्थापनांमध्ये फक्त प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाईल. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | ३. Fresher (Non ITI) शिकाऊ उमेदवारांचीच Trade Theory, Workshop Calculation and Science, Employability Skills, Engineering Drawing आणि Practical ची परीक्षा घेतली जाईल.<br>**राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना**<br>(National Apprenticeship Promotion Scheme - NAPS)<br>केंद्र शासनाची National Apprenticeship Promotion Scheme - NAPS ही योजना दिनांक १९/०८/२०१६ पासून शिकाऊ उमेदवारांच्या भरतीकरीता प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाचे शिकाऊ उमेदवारांच्या भरतीचे प्रमाण वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. याकरिता केंद्र शासनाने रुपये १० हजार कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला असून महाराष्ट्र राज्याकरिता रु. १९,७६,८०,३५०/- (एकोणीस कोटी शहात्तर लाख ऐंशी हजार तीनशे पन्नास फक्त ) इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | • शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी आस्थापनांना दिनांक १९/०८/२०१६ पासून दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या २५% किंवा रु. १५००/- यापैकी कमी असलेली रक्कम आस्थापनेला देय असेल.<br>• या योजने अंतर्गत फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षण कालावधीत ही रक्कम देय नाही. फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षणाची रक्कम (रु. ७५००/- जास्तीत जास्त) ५०० तास/३ महिने एवढी देय राहील.<br>• कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचा शासन निर्णय क्र. राशिउ-२०२२/प्र.क्र. ६४/व्यशि-३ दिनांक ०२.०८.२०२२ अन्वये **“राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस”** (National Apprenticeship Promotion Scheme) प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.<br>• कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचा शासन निर्णय | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | क्र. राशिउ-२०२२/प्र.क्र.६४/व्यशि-३ दिनांक १०.११.२०२२ अन्वये “राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेकरीता (National Apprenticeship Promotion Scheme) नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक मंजूर करुन देण्यांत आलेला आहे.<br>• राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेतंर्गत (NAPS) ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत एकुण १६३३ आस्थापनांना रु.१८,५७,७२,६८८/- एवढ्या रकमेचे वाटप करण्यांत आलेले आहे.<br>**महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना**<br>(Maharashtra Apprenticeship Promotion Scheme - MAPS)<br>कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. ०३.०६.२०२१ अन्वये शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी “महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (Maharashtra | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | Apprenticeship Promotion Scheme - MAPS)" राबविणेबाबत निर्णय घेण्यांत आला आहे.<br><br>• महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये ५,०००/- यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील.<br><br>• शिकाऊ उमेदवाराच्या मूलभूत प्रशिक्षण कालावधीत सदरील लाभ शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय असणार नाही. तथापि, मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु. २०/- प्रतितास या दराने (केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु. १५/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु. २,५००/- एवढी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.<br><br>• ज्या मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु. २०/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु. १०,०००/- एवढी प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील."<br><br>• कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.२५८/व्यशि-३, दि.२५.१०.२०२१ अन्वये महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेचा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक मंजूर करुन देण्यांत आलेला आहे.<br><br>• महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेची सुलभ, प्रभावी, जलद अंमलबजावणी व संनियंत्रण कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या नवीन स्वतंत्र संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पद्धतीने करण्यात येईल.<br><br>• सदरील संकेतस्थळ केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळासमवेत संलग्न करण्यात येईल.<br><br>• महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)" पद्धतीने अदा करण्यात येईल. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय शिकाऊ उमदेवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत विद्यावेतन प्रतिपूर्तीचे तिमाही दावे निकाली काढल्यानंतर महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत विद्यावेतनाचा लाभ शिकाऊ उमेदवारांना अदा करण्यात येईल. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| १८ | जागतिक बँक सहाय्यित "**औदयोगिक मुल्य वृध्दीकरणासाठी कौशल्यांचे बळकटीकरण करणे** "**(STRIVE) :-** औदयोगिक प्रशिक्षण संस्था तसेच शिकाऊ उमेदवारी अंतर्गत देण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाची औदयोगिक आस्थापनांच्या गरजेनुसार प्रासंगिकता व कार्यक्षमता वाढविण्याकरीता जागतिक बँक सहाय्यित "औदयोगिक मुल्य वृध्दीकरणासाठी कौशल्यांचे बळकटीकरण करणे"(Skills Strengthening for Industrial Value Enhancement (STRIVE) प्रकल्प देशातील सर्व राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी २०२४ पर्यंत वाढविण्यसात आला आहे.<br>STRIVE प्रकल्पात राज्यामध्ये ७२ शासकीय औ.प्र.संस्था व ४ खाजगी औ.प्र.संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेमध्ये सुधारणा करण्याकरीता व योजनेची व्याप्ती वाढविण्याकरीता ३ औदयोगिक आस्थापनांच्या समुहांचा (Industry clusters) प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आला आहे.<br>जागतिक बँक सहाय्यित STRIVE प्रकल्पाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याकरीता शासन निर्णय दिनांक २२.८.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.<br>केंद्र शासन पुरस्कृत 'विद्यमान शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा आदर्श औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये **(Model ITIs)** दर्जावाढ करणे **(Upgradation of existing Government ITIs into Model ITIs) :-** | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसांत निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून कार्यवाही करण्यांत येईल. | निरीक्षक, प्रमुख लिपीक, कनिष्ठ लिपिक (चौथा मजला) (नवीन इमारत) दुरध्वनी क्रमांक ०२२- २२६२०६०४ / २९३<br>तसेच संबंधित औ. प्र. संस्थांचे प्राचार्य | संचालक (चौथा मजला) (नवीन इमारत) दुरध्वनी क्रमांक ०२२ - २२६२०६०४/ २९३ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | स्थानिक उदयोग धदयांमध्ये मागणीनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून देण्यात येणाऱ्या व्यवसाय प्रशिक्षणाची गुणवत्तावाढ करण्यासाठी व सदर प्रशिक्षणाचा दर्जा उत्कृष्ट होण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरीता राज्यातील किमान एका विद्यमान शासकीय औ.प्र.संस्थेचा Model ITI म्हणून दर्जावाढ करण्यात येणार असुन शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३३१५/ प्र.क्र.१६/व्यशि-३ दिनांक १३ जुलै २०२१ अन्वये औ.प्र.संस्था, नाशिक येथे हि योजना राबविण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजना राबविण्याकरीता केंद्र शासनाने विहीत केलेल्या Implementation Manual नुसार अंमलबजावणी करण्यात येणार असुन औ.प्र.संस्थेत कालबाहय झालेले व्यवसाय बदलणे तसेच संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सल्ल्यानुसार नवीन व्यवसाय सुरु करणे, अल्पमुदतीचे व्यवसाय राबविणे, टीसीपीसी सेलची स्थापना करणे संस्थेचा दर्जावाढ करणे इ. बाबी अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.<br>**पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे देशातील १३९६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे दर्जावाढ करणे.**<br>राज्यात एकुण ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्था असुन सर्व संस्थांचा दर्जावाढ करून दिले जाणारे प्रशिक्षण कारखान्यांतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने राज्यातील २५० औ. प्र. संस्थांचा दर्जावाढ केंद्र पुरस्कृत पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजने अंतर्गत करण्यात येत आहे. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | या योजनेत औ. प्र. संस्थांकरिता एका Industry Partner ची सहयोगी उद्योग म्हणुन निवड करण्यात येते. संबधित Industry Partner (IMC अध्यक्ष), राज्य शासन व केंद्रशासन यांच्या त्रिपक्षीय सामंजस्य करार केला जातो. या Industry Partner च्या अध्यक्षतेखाली संस्था व्यवस्थापन समिती (IMC) स्थापन करण्यात येते त्या समितीत परिसरातील अन्य चार Industry Partner सभासद असतात. तसेच शासनाचे सहा प्रतिनिधी असुन प्राचार्य हे सदस्य सचिव असतात.संस्था व्यवस्थापन समितीला (IMC) सोसायटी नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी करून शैक्षणिक व आर्थिक स्वायत्तता देण्यांत आलेली आहे. सदर समितीच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये प्रत्येकी रू.२.५० कोटी रक्कम व्याजमुक्त कर्ज रूपाने केंद्र शासनाकडुन जमा करण्यात आलेले आहे. या कर्जाच्या रकमेतुन संस्थेचा गुणात्मक विकास करावयाचा असुन विविध उपक्रमामधुन महसुल उत्पन्न प्राप्त करावयाचे आहे. सदर बिनव्याजी कर्ज प्राप्त झाल्यानंतर ११ व्या वर्षापासून २० वर्षात समान वार्षिक हप्त्यामध्ये केंद्रशासनास परत करावयाचे आहे.<br>सन २००७-०८ पासुन या योजनेची अंमलबजावणी देशात तसेच राज्यात सुरु झालेली आहे. या योजनेतंर्गत २००७-०८ या वर्षात राज्यातील ६२, २००८-०९ मध्ये ५५, २००९-१० मध्ये ६०, सन २०१०-११ मध्ये २९ व सन २०११-१२ मध्ये ४४ अशा एकुण २५० औ.प्र.संस्थाचा समावेश करण्यांत आलेला असुन प्रत्येकी रू.२.५० कोटी प्रमाणे एकुण रू.६२५ कोटी व्याजमुक्त कर्ज रूपाने समितीच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १९ | <u>व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना</u><br>• व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील पीपीपी योजनेतंर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औ. प्र.संस्थांमध्ये केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणा-या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) प्रशिक्षणार्थ्याना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत **शासन, कौशल्य, उद्योजकता,रोजगार व नाविन्यता, विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे स्तरावरुन** मान्यता देण्यात आली आहे.<br>• ही योजना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत महाआयटी कार्यालयाच्या महाडीबीटी ऑनलाईन पोर्टलवरुन राबविली जात आहे.<br>१) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,शासन निर्णय क्र.आयटीसी-२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३,दि.२९.०५.२०१९, | | श्री. रा. रा.आगे, निरीक्षक, कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १९<br><br>दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६२०६०३/६०४ | श्री.म.बा. बंडगर, सहाय्यक संचालक(तां.)तथा पर्यवेक्षकीय अधिकारी कार्यासन क्र. १९<br><br>मा.संचालक<br><br>दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६२०६०३/६०४ |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | दि. १५/०३/२०२१ व दि.०९/०९/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br><br>२) अनुसुचित जाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. व्यप्रशु-२०१९/ प्र.क्र.१७३/ शिक्षण-१, दि.०१.०८.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br>३) अनुसुचित जमातीच्या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-२०१९/ प्र.क्र.७४/ का-१२, दि.२९.०७.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br>४) दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटिआय-२०१९/प्र.क्र.५७/व्यशि-३, दि.२०.०९.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br>५) विमुक्त जाती आणि भटक्या जमातीएइतर मागास वर्ग, व विशेष मागास प्रवर्गातीलप्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासइतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय २०१९/प्र.क्र.६८(भाग-१)/शिक्षण, दि. ०२.०८.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.<br>• व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) शासकीय पीपीपी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती या योजनेचा लाभ देण्यात येतो.<br>• अनुसूचित जाती प्रवर्गातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना मा.आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत या योजनेचा लाभ देण्यात येतो.<br>• अनुसूचित जमाती प्रवर्गातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे कार्यालयामार्फत या योजनेचा लाभ देण्यात येतो.<br>• इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत या योजनेचा लाभ देण्यात येतो.<br>६) **पात्रता:**<br>१) शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत (पीपीपी) प्रवेशासाठी उपलब्ध जागा व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने (Centralized Online Admission Process) प्रवेश घेतलेले | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षणार्थी पात्रतेचे इतर निकष पूर्ण करीत असल्यास पात्र आहेत.<br>२) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवस्थापन कोट्यातील जागांवर (Management Seats) व संस्थास्तरावर भरण्यात येणाऱ्या जागांवर (Institute Level Seats) प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी सदर योजनेंतर्गत लाभास पात्र नाहीत.<br>३) प्रवेश घेतलेल्या तुकड्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT) यांची संलग्नता (Affiliation) आवश्यक आहे.<br>४) प्रशिक्षणार्थ्याने यापूर्वी शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला नसावा. म्हणजेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रथमच प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी पात्र आहेत.<br>५) प्रशिक्षणार्थ्याने केंद्र अथवा राज्य शासनाच्या अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण/ कंपन्या/ महामंडळे यांनी पूरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमांचा या पूर्वी लाभ घेतलेला नसावा.<br>६) प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र धारक असावा.<br>७) योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ २ अपत्यांपर्यत मर्यादित राहील.<br>**७) योजनेअंतर्गत दिले जाणारे लाभ:**<br>१) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा कमी असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.<br>२) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त व रु. ८ लाखापर्यत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.<br>३) इयत्ता १० वी अनुतीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापर्यत आहे व इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५१ लाख ते रु. ८ लाखापर्यंत असल्यास त्यांना खाजगी | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.<br>a. इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेस पात्र आहेत.<br>b. दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.<br>c. विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातीलप्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखापर्यत आहेत्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.<br>**व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे.**<br>१. आधार नोंदणी कार्ड<br>२. प्रशिक्षणार्थ्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड | | | |

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| | ३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)<br>४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला<br>५. जातीचा दाखला<br>६. जात वैधता प्रमाणपत्र - फक्त अनुसुचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू<br>७. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र - फक्त खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांकरीता लागू<br>८. दिव्यांग प्रवर्गातिल प्रशिक्षणार्थ्याकरीता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.<br>पुढील वर्षातील ३१ मार्च पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र - विमुक्त जाती आणि भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी. | | | |

परिशिष्ठ १

संचालक ( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण )
संचालनालयाच्या स्तरावर विविध प्रशिक्षण योजनांच्या धोरणात्मक बाबींवर  निर्णय घेणे
दुरध्वनी क्रमांक २२६९५८१९
( चौथा मजला , नवीन इमारत )

| विषय | कार्यासने | | विषय | कार्यासने |
|---|---|---|---|---|
| आस्थापना व प्रशासन | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक १,२, ३, ४, ५, ६ व १७ | | ई गर्व्हनस | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक १६ |
| संस्था व्यवस्थापन | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक ८,९,७,१० व १८ | | कौशल्य विकास कार्यक्रम | कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ७ व १९ |
| नियोजन व वित्त व्यवस्थापन | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक ११,१२ व १५ | | भांडार / खरेदी व्यवस्थापन | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक १३ व १८ |
| बांधकाम व्यवस्थापन | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक १४ | | | |
| माहिती अधिकार | कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक ०२ तसेच संचालनालयातील सर्व कार्यासने. | | | |